Gajanan Maharaj Prathna

हे परमेश्वरा! आमच्या परिवाराच्या उद्धारासाठी जे महान जीव स्वतः कष्ट सहन करून प्रत्येक क्षणी झिजत आहेत, त्यांच्या उपदेश आणि आदेश अनुसार आमचे आचरण पवित्र होवो, अशी कृपा कर.
आत्तापर्यन्त आमच्या कडून झालेल्या चुकांची आणि पापांची पुनरावृती न होवो.
बिकट, आर्थिक तसेच अन्य प्रतिकुल परिस्थितीमुळे त्रासून तसेच मानसिक किंवा संकुचित विचारांच्या आहारी जाऊन, आमच्या मनातील आळशीपणामुळे किंवा अज्ञानामुळे त्यांच्या विषयी अयोग्य विचार आले असतील किंवा अयोग्य विचार उच्चारले असतील किंवा त्यांच्या आदेश शिवाय कुठलेही कार्य झाले असेल, तर त्या सर्वांसाठी मी निस्वार्थ मानाने तुमची आणि सर्वांची क्षमा मागतो/ मागते.
आमच्या परिवारामध्ये सदैव सुख, शांती, संतोष आणि एक-दुसऱ्या विषयी ममता आणि आनंद नांदू दे,
त्याचप्रमाणे आमच्या सगळ्यांच्या मनात तुझ्याविषयी अटूट श्रद्धा सदैव जागृत राहू दे.
त्यांनी विचार केलेले महान कार्य, आम्ही आमच्या उर्वरित आयुष्यात पूर्ण करण्यात यशस्वी होवो, तसेच अजून अनेक सत्कृत्य करत राहो, अशाप्रकारे ते महान दिव्य जीव आम्हावर सदैव आनंदी राहोत, तसेच आमच्या परिवारावर आपली कृपादृष्टी अशाच प्रकारे राहू द्या.
हे परमेश्वरा! आमच्या परिवारातील सर्व व्यक्तींना आप-आपली कर्तव्य-कर्म पूर्ण करण्याची सद्बुद्धी दे.
पूर्वजन्मीच्या सत्कर्मामुळे जरी आमच्या पैकी काही व्यक्ती जर आज सुखमय जीवन जगत असतील तरी "पुढच्या जन्माची काळजी मनुष्याने ह्याच जन्मी केली पाहिजे" , ह्या तुमच्या पवित्र वचना अनुसार जी शिकवण तुम्ही संपुर्ण ब्रम्हांडाला दिलेली आहे त्याला अनुसरून आणि उपकारांची परतफेड अपकारानि न होवो अशी बुद्धी, हे दयाघना, आमच्या परिवारातील प्रत्येक व्यक्तीस तुम्ही द्या, केवळ हिच प्रार्थना मी आपल्या चरणी अत्यंत भक्ती भावाने अर्पण करत आहे.

! शुभं भवतु !!

! जय गजानन !!

Gajanan Maharaj Pasaydan

प्रभू थोर शेगावचा तूच आहे ।।
'अनन्यासी रक्षी' तुझे ब्रीद आहे।
'करुणाकरा' या, ब्रिदा सार्थ व्हावे।।
महाराज माझे जवळी राहावे।।१।।

असे मागणे ते, तुझ्या पायी आता ।
तुझ्याविण कोणी मला नाही त्राता ।।
प्रभो सर्व या, संकटा निरवावे ।
महाराज, माझे जवळी राहावे ।।२।।

प्रभो! जन्मी या मी, किती पाप केले |
तया जाणीवेने, मन हे जळाले ||
आता मात्र देवा, मला सावरावे |
महाराज माझे जवळी राहावे ||३||

अपराध माते! पदरात घ्यावे |
आता बालका या, जवळी करावे ||
मम् 'प्रकृतीला', गडे आवरावे |
महाराज, माझे जवळी राहावे ||४||

प्रभातीस अस्पष्टसी जाग यावी |
तुझिया कृपेने, कुडी हि उठावी ||
शुचिर्भूत प्राची 'स्मृती' दान द्यावे |
महाराज, माझे जवळी राहावे ||५||

काम, क्रोध, दोषा, मना ना शिवावे |
शुचिर्भूत आचार वृत्तीत यावे ||
तै शुद्ध बुद्धी मला दान द्यावे |
महाराज, माझे जवळी राहावे ||६||

आम्हा अन्न देतो, तया आधी देणे |

तयावीण आम्ही, कदा नाही खाणे ||
इये वृत्तिने 'शक्ती' दानास द्यावे |
महाराज माझे जवळी राहावे ||७||

नीतीयुक्त सात्विक, लक्ष्मि मिळावी ।
प्रपंचात सत्कर्मी, ती वापरावी ।।
अशा दृष्टीने, 'लक्ष्मि' दानास द्यावे ।
महाराज माझे जवळी राहावे ।।

सुखे झोपता, जाण काढोनी घ्यावी ।
बरे, वाईटाची स्मृती ना रहावी ।।
कृपाळूपणे 'शांती' दानास द्यावे ।
महाराज, माझे जवळी राहावे ।। ९ ।।

प्रपंचात कर्मे, असता करीत ।
तयामाजी राहो, सदा सावचित ।।
अनैतिक कृत्ये, कदा ना घडावे ।
महाराज, माझे जवळी राहावे ।।१०।।

भवामाजी कर्मे, नियमित व्हावी ।
कुटुंबा, मुलांची, प्रिती सार्थ व्हावी ।।
व्यवहारी चित्ते, असक्तेन रहावे ।
महाराज, माझे जवळी रहावे ।।११।।

नको काम, क्रोध, नको दुष्ट बुद्धी ।
सुविचार, शांत, समाधान वृद्धी ।
असे भाव माझ्या, मनी नित्य यावे ।
महाराज, माझे जवळी रहावे ।।१२।।

प्रती मासी वा वर्षी हा योग यावा ।
तुझ्या मंदिरी दर्शना लाभ व्हावा ।।
अखंडीत वारी, मला गंुतवावे ।
महाराज, माझे जवळी राहावे ।।१३।।

धन, मान, कीर्ती, प्रपंची मिळाले ।
कधी दुःख, भोग, पदरांत आले ।।
इये दोन्ही काळी, समत्वे वरावे ।
महाराज, माझे जवळी राहावे ।।१४।।

तुम्हा वर्णिता, वर्णिता, मी रमावे ।
समस्तांचिया अंतरी एक व्हावे ।।
माझे, तुझे तई, अभिन्नत्व व्हावे ।
महाराज, माझे जवळी राहावे ।।१५।।

तुझ्या चिंतनी चित्त एकत्र व्हावे ।
तुझ्या दर्शने, नेत्र त्रूप्तीत व्हावे ।।
तुला पाहता पाहता, भान जावे ।
महाराज, माझे जवळी राहावे ।।१६।।

तुझी मूर्त दृष्टी समोरी असावी ।
प्रभो! माझी देहस्थिती विसरावी ।।
तुझेवीण आता, कुणी ना दिसावे ।
महाराज, माझे जवळी राहावे ।।१७॥

यमुना जलाने, शुचि स्नान व्हावे ।
मुखी शुद्ध गंगोदके बा पडावे ।।
ओठांत तुलसी, दलाने राहावे ।
महाराज, माझे जवळी राहावे ।।१८।।

त्रिगुणात्मके, भाव वृत्ती नसावा ।
प्रसादे तुझ्या, भोग माझा सरावा ।।
पुढे जन्म-मृत्यु कदाना मिळावे ।
महाराज, माझे जवळी राहावे ।।१९।।

दिला मोक्ष तू, भास्करा बा जसा रे ।
दिला मोक्ष तू, भक्त बाळा जसा रे ।।
मलाही प्रभो, त्या स्थळा पोचवावे ।
महाराज, माझे जवळी राहावे ।।२०।।

क्षणी शांत ऐशा, प्रभो प्राण जावा ।
जिवा आसरा त्या शिवाचा मिळावा ।।
मिसळून ज्योतीस तेजात घ्यावे ।
महाराज, माझे जवळी राहावे ।।२१।।